**वित्तीय वर्ष, २०१३-१४ च्या वार्षिक योजनेतील नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.**

**प्रास्ताविक**

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या " महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४" याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे. दिनांक ५ सप्टेंबर, २०११ रोजी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश २०११" काढला (यात या पुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्याय्यतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे नियत वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात दर्शवण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील.

**सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती**

४. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) जिल्हानिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते.**(जोडपत्र-१)**. सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष रु. ७४१८ कोटी होता. वर्ष २००० मध्ये त्याची पुनर्गणना प्रचलित मापदंड विचारात घेऊन रु.६६१८. ३७ कोटी इतकी सुधारीत करण्यात आली होती. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्हयांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य एककामध्ये राज्य सरासरी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्‌धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या अहवालानुसार, निर्देशांक व अनुशेष समितीने १.४. १९९४ रोजी गणना केलेल्या अनुशेषापैकी, जून २००९ मध्ये २,७३,७२० हेक्टर (रब्बी समतुल्य) एवढा सिंचन अनुशेष शिल्लक होता. हा अनुशेष राज्यातील रत्नागिरी, बुलढाणा, अकोला (वाशिम सह) आणि अमरावती या चार जिल्हयांमध्ये अस्तित्वात होता. जलसंपदा विभागाने २०१०-११ पासून २०१४-१५ पर्यंतची या भौतिक अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना तयार केली होती. या योजनेनुसार, सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये अनुक्रमे ३७,३१० हेक्टर आणि ५८,६८३ हेक्टर भौतिक अनुशेष निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित होते. मात्र, या वर्षांचे प्रत्यक्ष साध्य फक्त ९५७० हेक्टर व १३,९२९ हेक्टर एवढे झाले.**(जोडपत्र-२)** परिणामी, जलसंपदा विभागाला ही योजना वार्षिक लक्ष्ये सुधारित करावी लागली आणि योजनेचा कालावधी २०१५-१६ पर्यंत करावा लागला. **जोडपत्र-३** मध्ये अमरावती विभागाची भौतिक अनुशेष निर्मूलनाची सुधारित योजना दर्शविण्यात आली आहे. **जोडपत्र-४** मध्ये भौतिक अनुशेष निर्मूलनाचा वित्तीय कार्यक्रम दर्शविण्यात आला आहे. जून २०१२ चा उर्वरित भौतिक अनुशेष रसतुमध्ये २,३४,०१९ हेक्टर एवढा आहे. रत्नागिरी जिल्हयाचा अनुशेष दूर झाला असल्याचे कळविण्यात आले आहे.

६. राज्यपाल यांचे असे निदर्शनास आले आहे की, अमरावती विभागाचा भौतिक अनुशेष निर्मूलनाचा वेग तयार करण्यात आलेल्या भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रमाच्या प्रमाणात नाही. अनुशेष निर्मूलनाच्या कमी वेगावरुन प्रशासकीय अडथळे दूर करण्यासंदर्भात बरेच काही करण्याची आवश्यकता असल्याचेही दिसून आले. अनुशेष निर्मूलनाच्या वेगाबाबत राज्यपाल जरी असमाधानी असतील तरी त्यांनी मुख्य सचिवांनी प्राथम्य प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी केलेल्या प्रयत्नांबाबत समाधान व्यक्त केले आहे. राज्यपाल यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, पुढील आर्थिक वर्षी देखील अशाचप्रकारे सुक्ष्म संनियंत्रण करण्याची प्रक्रिया सुरु राहील.

**सिंचन क्षेत्रातील नियतवाटपाची तत्वे (जनजाति उपयोजना)**

७. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जनजाती उपयोजने अंतर्गत उपलब्ध निधीचे प्रदेशनिहाय वितरण त्या त्या प्रदेशाची आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५०% भारांक देवून करण्यात यावे. या तीन प्रदेशांसाठी असलेली आदिवासी उपयोजना निधींच्या हिश्यांची टक्केवारी **जोडपत्र ६-ब** मध्ये दिलेली आहे.

८. आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये जलसंपदा विभागाने असे सादर केले होते की, मराठवाडा प्रदेशात आदिवासी विकास विभागाने निश्चित केलेल्या निकषात पात्र असणारा एकमेव प्रकल्प असल्यामुळे आदिवासी उपयोजनेखालील नियतव्यय वापरणे शक्य झाले नाही. मराठवाडा प्रदेशासाठी आदिवासी उपयोजनेत राखून ठेवलेला निधी पूर्णपणे उपयोगात आणण्याच्या दृष्टीने वरील निकषात बसणारे पर्याप्त प्रकल्प हाती असतील याबाबत जलसंपदा विभागाने आवश्यक कार्यवाही करावी असे निदेश राज्यपाल यांनी दिले होते. याबाबत तातडीने कार्यपूर्तीची गरज आहे.

## २०१३-१४ या वार्षिक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप

९. नियोजन विभागाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या पत्राद्वारे असे दर्शविले आहे की, वार्षिक योजना २०१३-१४ मध्ये जलसंपदा विभागाकरिता **रु. ८२१६.७३ कोटी** इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यापैकी, **रु. ४४७.३४ कोटी** इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प आणि लाभक्षेत्र विकास अशा योजनांकरिता राखून ठेवण्यात येईल. आणखी, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार कार्यक्रम, सामाईक योजना (जल विज्ञान प्रकल्प, यांत्रिकीकरण व गुणवत्ता नियंत्रण इ.) आणि घ्यावयाचे प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे यां सारख्या अविभाज्य योजनांसाठी **रु.५०० कोटी** इतका नियतव्यय ठेवण्यात येईल.

१०. आंतरराज्य प्रकल्पांसाठी **रु.६० कोटी** आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी **रु. ५०७ कोटी** इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार, ५ आंतरराज्य प्रकल्प आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास सहमती दिली आहे. आणखी, राज्यपाल यांनी, राज्य शासनाच्या शिफारशीवरुन, ठाणे जिल्हयातील भातसा-मुमरी प्रकल्पाला नक्त प्रत्याक्षी मूल्य अदा करण्यासाठी **रु. ३४.५३ कोटी** रक्कम निदेशाबाहेर ठेवण्यासाठी मान्यता दिली आहे. जलसंपदा विभागाकरिता उर्वरित **रु. ६६६७.८६ कोटी** इतके विभाज्य नियतवाटप आहे. यामध्ये, आदिवासी उपयोजनेखालील **रु. १०४.६९ कोटी** आणि सर्वसाधारण योजनेसाठी **रु. ६५६३.१७ कोटी** अंतर्भूत आहेत.

११. शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे लागणारा आवश्यक निधी, आणि एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की , वार्षिक योजना २०१३-१४ मध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप खालील प्रमाणे करण्यात येईल.

(१) सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतूदीमधून, ज्या जिल्हयांचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्या अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. अनुशेष निर्मूलनासाठीच्या निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामाची प्रगती लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, या ४ जिल्हयांसाठी **रु. ७५० कोटी** इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.मागील निदेशांमध्ये आर्थिक वर्ष २००८-०९ पर्यंतच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अंमलात आणण्यात आल्या आहेत. मात्र, १.४.२००९ च्या सुरुवातीच्या शिल्लकेबाबत अदयाप ताळमेळ घालण्यात आलेला नाही. त्यामुळे, आर्थिक वर्ष २००९-१० व त्यापुढील वर्षांसाठी प्रदेशनिहाय दुरुस्त्या चालू निदेशांमध्ये अंमलात आणण्यात आल्या नाहीत. परिच्छेद ३९ मध्ये नमूद केल्यानुसार मुख्य सचिवांनी अहवाल सादर केल्यानंतर त्या अंमलात आणण्यात येतील.

(२) वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी **जोडपत्र-६ अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे. जनगणना २०११ ची लोकसंख्या यासाठी उपयोगात आणण्यात आली आहे.

(३) जनजाति उपयोजनेखालील निधीचे नियतवाटप **जोडपत्र-७ ब** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(४) सिंचन क्षेत्रासाठी प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप खालील तक्त्यात दिले आहे. (रु. कोटी)

| प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतवाटप | आदिवासी उप योजना निधीचे नियतवाटप **(जोडपत्र-७ब पहावे)** | उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप **(जोडपत्र ७ अ पहावे)** | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|---|
| विदर्भ | ७५०.०० | ४६.३५ | १४९१.०८ | २२८७.४३ |
| मराठवाडा | ०.०० | ५.६३ | १३१०.२९ | १३१५.९२ |
| उर्वरित महाराष्ट्र | ०.०० | ५२.७१ | ३०११.८० | ३०६४.५१ |
| एकूण | ७५०.०० | १०४.६९ | ५८१३.१७ | ६६६७.८६ |

१२. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला (वाशिम सह) आणि बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले नियतवाटप हे, उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्हयांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांच्या उपलब्ध झालेल्या एकत्रित नियतवाटपातून या जिल्हयांमधील चालू कामांसाठी, अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, लागणा-या निधीची पूर्तता होईल, अशी अपेक्षा आहे.

१३. आणखी राज्य शासनाने, सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वर दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये वरील परिच्छेद ११(२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरीक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण **जोडपत्र-७ अ व ७ ब** मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

१४. वार्षिक योजना २०१३-१४ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाचे वितरण हे काटेकोरपणे प्रदेशनिहाय नियतवाटपाच्या प्रमाणात असावे. सचिव(जलसंपदा) यांनी तीनही विभागतील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेंव्हा खर्चाबाबतची सुत्रे तंतोतंत जुळण्यासाठी सुधारणेबाबत उपाय योजावेत.

१५. राज्यपाल यांच्या दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशात, प्रधान सचिव (नियोजन), प्रधान सचिव (वित्त ), व प्रधान सचिव (जलसंपदा) यांच्या समितीने कार्यनिहाय नियतवाटपाची योजना तयार करुन राज्य शासनाच्या उचित प्राधिकरणाकडे त्यांच्या विचारार्थ सादर करावी असे नमूद करण्यात आले होते.शासनाने आता असे कळविले आहे की, तीन प्रधान सचिवांची समिती प्रकल्पनिहाय नियतवाटप अंतिम करत आहे. राज्यपाल यांनी आदेश दिले आहेत की, प्रकल्प निवडतांना ही समिती

नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेसाठी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुकरण करील. नियतवाटप करतेवेळी समितीने पुर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम दयावा, जेणेकरुन त्यांचे फायदे नजिकच्या काळात शेतक-यांना मिळतील याची खात्री करेल.

१६. राज्यात १.४.२०१२ ला प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांची (आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रकल्पांसह ) उर्वरित किंमत **रु. ७८,४५१ कोटी (जोडपत्र ५)** एवढी असल्याबाबत राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे. अर्थसंकल्पीय साधन संपत्ती मर्यादित असल्याने या प्रकल्पांचा प्राथम्यक्रम ठरविणे गरजेचे आहे. जर ही मर्यादित साधन संपत्ती अनेक प्रकल्पांवर "पसरवली" गेली तर परिणामी दरवाढ व कालापव्यय होईल आणि, अखेरीस या कामांमुळे मिळणारे लाभ त्यावर होणा-या खर्चाशी अनुरुप नसतील. म्हणून, राज्यपाल यांचे असे मत आहे की, प्रगतीपथावर असणारी कामे पूर्ण करण्यासाठी प्रकल्पांच्या अग्रक्रमाबाबत अगदी विचार पूर्वक धोरण असावे आणि कामांना गती देण्याची विशेष मोहीम हाती घ्यावी. राज्यपाल यांनी शासनाने निदेशांतील नियतव्यय सुत्रांच्या अधिन राहून दुष्काळी भागातील अंतिम टप्प्यात असणा-या प्रकल्पांना प्राथम्य देऊन ते पूर्ण करण्याच्या शासनाच्या निश्चयाबाबत समाधान व्यक्त केले आहे. शासनाने हा प्राथम्यक्रम निदेशात नमूद केलेल्या प्रधान सचिवांच्या समितीने निश्चीत केल्याप्रमाणे असेल असेही ठरविले आहे. राज्यपाल यांचे असेही मत आहे की नवीन प्रकल्प हाती घेऊन सिंचन क्षेत्रातील बांधील खर्चाचा अग्रक्रम कमी केला जाऊ नये. मात्र, दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशात नमूद केल्यानुसार, विदर्भ प्रदेशातील गोदावरी नदीच्या खो-यातील उपलब्ध पाण्याचा पूर्ण वापर करण्यासाठी, शासनाने पर्याप्त प्रकल्प शेल्फवर ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत. मात्र, साधन संपत्ती वरील भार टाळण्यासाठी हे प्रकल्प हाती घेण्याचे टाळावे.

१७. राज्यपाल यांच्या दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशात राज्यपाल यांनी जलसंपदा विभागास, वित्त विभाग, नियोजन विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सल्ल्याने चालू प्रकल्पांच्या"व्याप्तीतील" बदलास प्रशासकीय मान्यता देणेबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याचे सूचित केले होते. ही मार्गदर्शक तत्वे अंतिम करण्याच्या शेवटच्या टप्प्यात असल्याचे शासनाने कळविले आहे. राज्यपाल यांनी ही तत्वे अंतिम करुन लवकरात लवकर निर्गमित होतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**सिंचन क्षेत्राशी निगडीत प्रशासकीय बाबी**

१८. राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, अनुशेषांतर्गत जिल्हयांमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या प्रमाणात भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झालेली नाही. पुरेसा कर्मचारी वर्ग, अधिकारांचे प्रत्यायोजन, जमिनीची उपलब्धता आणि पुनर्वसनास होणारा विलंब या बाबींकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे, ज्यायोगे हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करता येतील. राज्य शासनाने जमिनीची मोजणी, भुसंपादन आणि पुनर्वसन अशा कार्यांसाठी असलेल्या विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत खात्री करावी. राज्य शासनाने मोठे प्रकल्प कालबद्धरित्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने जेथे आवश्यकता असेल तेथे अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध होईल असेही पहावे.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती

१९. दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचनक्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमधील परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा, **रु.६५८८.७७ कोटी** इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ पासून जानेवारी २०१३ अखेर पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष **रु. ५९९.०८ कोटी** गणना करण्यात आला आहे **(जोडपत्र ८).** वित्तीय अनुशेष फक्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहे.

## ऊर्जाः कृषी पंपसंचाना वीज पुरवठा करणे

२०. ऊर्जा क्षेत्रात कृषी पंप-संचांच्या विद्युतीकरणाचा वित्तीय अनुशेष दिनांक १ एप्रिल, २००९ रोजी पूर्णपणे भरुन काढण्यात आलेला आहे. तथापि, ऊर्जा विभागाने दि १ फेब्रुवारी, २०१२ रोजी ६ जिल्हयामध्ये ५८,०६८ पंप-संचांचा भौतिक अनुशेष असल्याचे कळविले आहे. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ अंतर्गत ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि विदर्भ विकास मंडळ अंतर्गत यवतमाळ,चंद्रपुर आणि गडचिरोली असे हे ६ जिल्हे आहेत. ऊर्जा विभागाने आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये या ६ जिल्हयांमध्ये ९९०० कृषी पंपाचे ऊर्जीकरणाचे उद्‌दिष्ट ठेवले होते. ऊर्जा विभागाने आता असे सादर केले आहे की, ऑक्टोबर २०१२ अखेर पर्यंत ७३९४ कृषी पंप ऊर्जीकृत झाले आहेत. अर्थात, १ नोव्हेंबर २०१२ रोजी ५०६७४ पंपाचा शिल्लक अनुशेष आहे. २०१३-१४ मध्ये ऊर्जा विभागाने ६१०० कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचे उद्‌दिष्ट प्रस्तावित केले आहे. प्रत्येक पंप संचासाठी **रु. १.५१६ लक्ष** सरासरी खर्च गृहित धरुन, विभागाने २०१३-१४ साठी **रु.९२.४८ कोटीची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२१. अनुशेष शिल्लक राहण्यामागे या ६ अनुशेषांतर्गत जिल्हयांमध्ये मागणीचा अभाव असल्याबाबत ऊर्जा विभागाकडून कळविण्यात येते. मात्र, जिल्हयांच्या अधिका-यांच्या मते अनुशेषांतर्गत जिल्हयांमध्ये अप्रगट मागणी आहे. ही बहूतांश जिल्हे दुर्गम आणि आदिवासी भागात असल्यामुळे या क्षेत्रातील अनुशेषाचे विशेष महत्व आहे. दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशामध्ये राज्यपाल यांनी जिल्हास्तरीय अधिका-यांनी विशेष मोहीम हाती घेऊन अभियान पद्धतीने मागणी वाढविण्याचे निदेश दिले होते. काही जिल्हास्तरीय अधिका-यांनी असे सादर केले आहे की, ज्या आदिवासी लाभार्थ्यांना वैयक्तिक वनहक्क मिळाले आहेत त्यांनी "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना" अंतर्गत त्यांच्या शेतात नवीन विहीरींचे खोदकाम सुरु केले आहे. या लाभार्थ्यांनी कृषी पंपाच्या विद्युतीकरणाबाबतचे अर्ज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सादरही केले आहेत. राज्यपाल यांनी ऊर्जा विभागाला या मागणीची नोंद घेवून त्या लाभार्थ्यांच्या कृषी पंपाचे विद्युतीकरण करावे असे निदेश दिले आहेत.

२२. कृषी पंपांच्या विद्युतीकरणाच्या मागणीची पूर्तता होण्याच्या दृष्टीने, विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विकास मंडळ नागपूर यांनी विभागामध्ये सौर ऊर्जेचा वापर करुन कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार, विभागीय आयुक्तांनी गडचिरोली जिल्हयासाठीच्या पथदर्शी प्रकल्पाचा सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे. ऊर्जा विभागाने सौर ऊर्जाद्वारे विद्युतीकरण हा विकल्प व्यवहार्य नसल्याचे मत दिले आहे. तथापि, राज्यपाल यांचे मत आहे की, ज्या प्रदेशात, जसे दुर्गमभाग, वन प्रदेश, डोंगराळ भूप्रदेश इ., परंपरागत विद्युतीकरण शक्य होत नाही, तेथे असा विकल्प तपासून पाहण्यासंदर्भात खोलवर अभ्यास करण्याची गरज आहे. म्हणून, राज्यपाल यांनी असे आदेश दिले आहेत की, ऊर्जा विभागाने याबाबत त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तिंमार्फत अभ्यास घ्यावा आणि अभ्यासाचे निष्कर्ष आणि शिफारसी राज्यपाल यांच्या विचारार्थ ३ महिन्यांच्या कालावधीत सादर कराव्यात.

**उच्च व तंत्र शिक्षण**

२३ उच्च व तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रातील अनुशेषामध्ये औद्योगीक प्रशिक्षण संस्था, माध्यमिक तंत्र शाळा, व तंत्रनिकेतन या तीन घटकांचा समावेश आहे. विभागाने औद्योगीक प्रशिक्षण संस्थामधील विद्यार्थी जागांचा अनुशेष दूर झाल्याचे कळविले आहे.अनुशेष निधीमधून १०० औद्योगीक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशासकीय इमारती आणि कर्मशाळा यांची बाधकामे हाती घेण्यात आली होती. या १०० इमारतीपैकी, ९० बांधकामे आर्थिक वर्ष २०११-१२ अखेरीस पूर्ण झाली आहेत. उर्वरित १० कामापैकी, जागे अभावी ३ कामे सुरु होऊ शकली नाहीत, २ इमारतींची बांधकामे प्रगतीपथावर असून ५ कामे अद्याप सुरु व्हावयाची आहेत. विभागाने वित्तीय वर्ष २०१३-१४ साठी प्रगतीपथावरील बांधकामांसाठी **रु.९ कोटींची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२४ तंत्र निकेतनाच्या उप क्षेत्रामध्ये २८१८ विद्यार्थी जागांचा अनुशेष होता. यापैकी, २४६९ विद्यार्थी जागांचा अनुशेष दूर झाला आहे. विभागाने असे कळविले आहे की, उर्वरित ३४९ विद्यार्थी जागांचा अनुशेषही आता भरुन निघाला आहे. २२ ठिकाणची तंत्रनिकेतनांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये विभागाने या चालू बांधकामांसाठी **रु. २०.३४ कोटींची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२५ तंत्र माध्यमिक शाळांच्या उप क्षेत्रामध्ये ५३०१ विद्यार्थी जागांचा अनुशेष होता. यापैकी ४६९३ विद्यार्थी जागांचा अनुशेष हा, १६ जिल्हयांमध्ये ३४ नवीन तंत्र माध्यमिक शाळा सुरु करुन ३१ मार्च, २०११ अखेर भरुन काढण्यात आला आहे. शिल्लक ६०८ विद्यार्थी जागांपैकी, ५९ जागांचा अनुशेष, आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये ६ तंत्र माध्यमिक शाळांमधील (ठाणे, नाशिक, गडचिरोली आणि जालना जिल्हयांतील) विद्यार्थी प्रवेश संख्येच्या क्षमतेत वाढ करुन दूर करण्यात आला आहे. उर्वरित ५४९ विद्यार्थी जागांचा अनुशेष मुंबई शहर (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर (२४० जागा) या जिल्हयांचा आहे. अनुशेष निधीचा वापर करुन ४२ तंत्र शाळांच्या प्रशासकीय इमारती आणि कर्मशाळा बांधकामे हाती घेण्यात आली. विभागाने वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये अनुशेष निधीमधून **रु. १२.८० कोटी** चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

**सार्वजनिक आरोग्य सेवा**

२६ दिनांक १ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये **रु. १३५३.६७ कोटी** वित्तीय अनुशेष होता. १ एप्रिल, २००० ते ३१ मार्च, २०१२ या दरम्यान अनुशेष दूर करण्यावर **रु. ६७६.९७ कोटी** खर्च झाला आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रासाठी आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये **रु. २२८.९७ कोटींची** तरतूद केली असतांना विभागामार्फत फक्त **रु. ११९.३७ कोटी** अर्थसंकल्पीत करण्यात आले. या क्षेत्राचा आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील (३१ जानेवारी, २०१३ पर्यंतचा) खर्च फक्त **रु. ३८.९३ कोटी** एवढाच आहे. सार्वजनिक आरोग्य या एकमेव क्षेत्रामध्ये वित्तीय अनुशेष अद्याप शिल्लक आहे याबाबत राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे. आणखी, सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांनी स्वतः तयार केलेल्या योजने नुसार अनुशेष निर्मूलनाची गती राखलेली नाही. म्हणून, राज्यपाल यांनी असे निर्देशित केले आहे की, सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व प्रशासकीय बाबींकडे लक्ष दयावे आणि चालू कामांचे सतत संनियंत्रण करुन ती कामे पुढील २ वर्षात पूर्ण होतील ते पहावे.

२७ विभागाने वित्तीय वर्ष २०१३-१४ करिता ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रुग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामग्री आणि फर्निचर या करीता **रु. २४७.७२ कोटी** इतकी रक्कम देण्याची विनंती केली आहे.

**सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटप**

२८ राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, वार्षिक योजना २०१३-१४ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी रुपये **३८२.३४** कोटी इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१३-१४ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अ. क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (रु. कोटीत) | एकूणाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | १२२.३८ | ३२.०० |
| २ | मराठवाडा | ५३.६५ | १४.०३ |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | २०६.३१ | ५३.९७ |
| ४ | एकूण | ३८२.३४ | १००.०० |

२९ प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्र-निहाय नियतवाटप जोडपत्र ९ मध्ये दर्शविलेले आहे. राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित योजनांतर्गत नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे.

३० सार्वजनिक आरोग्य आणि उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रांच्या नियतव्ययाचा मोठा भाग चालू स्थापत्य कामांसाठी आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य, उच्च आणि तंत्र शिक्षण, नियोजन, वित्त आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये समन्वय असण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे, जेणेकरुन अनुशेष निर्मूलनासाठीच्या निधीचा वापर होईल आणि अभियान पद्धतीने कामे पूर्ण होतील.

**उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययाचे वाटपाची तत्वे**

३१ सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियत वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियत वाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधिन राहील.

३२ राज्यपालांच्या पूर्वमान्यतेशिवाय, कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्हयांकडून अनुशेष नसलेल्या जिल्हयांकडे आणि एका विकास मंडळांच्या क्षेत्राकडून दुस-या विकास मंडळाच्या क्षेत्राकडे वळविता येणार नाही.

**विकास मंडळे**

३३ प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्हयांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशाप्रमाणे चालू राहतील. जिल्हयांची निवड करतांना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयांना प्राधान्य दयावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्‌देशानुसार मंडळांनी इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी विकास मंडळांना **रु.२ कोटी** राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. नियोजन विभागाने मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन दयावा.

**तज्ज्ञ समिती**

३४ विकास खर्चाचे समन्यायी तत्वावर वाटप करावयाच्या नवीन सुत्रांबाबत स्थापन करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने ३१ मे, २०१२ पर्यंत अहवाल सादर करणे अपेक्षीत होते. मात्र शासनाने समितीला अहवाल सादर करण्याचा कार्यकाल ३१ मार्च, २०१३ पर्यंत वाढवून दिला आहे. राज्य शासना-मार्फत समितीला वाढवून मिळालेल्या कालावधीमध्ये अहवाल सादर करण्यासंदर्भात सर्वतोपरी सहाय्य मिळेल अशी राज्यपालांची अपेक्षा आहे.

**निदेशांचे अनुपालन**

३५ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ११ (च) आणि कलम २१ (१) व (२) मधील तरतुर्दीनुसार, राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाची जबाबदारी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सिंचन क्षेत्राशी संबंधीत निदेशांच्या अंमलबजावणीचा नियतकालीक आढावा घ्यावा आणि राज्यपालांच्या माहितीसाठी तिमाही अहवाल सादर करावेत.

३६ दि. १० मार्च, २०११ च्या निदेशातील परिच्छेद ३५ च्या अनुपालना संदर्भात, नियोजन विभागाने सिंचन क्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चाबाबत तपशीलवार माहिती संकलित करण्याची नवीन कार्यप्रणाली विकसीत केली असल्याचे कळविले होते. ही कार्यप्रणाली सुरु झाली आहे. ही कार्यप्रणाली प्रदेशनिहाय खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी परिणामकारक ठरेल असे राज्यपाल यांचे मत आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, नियोजन विभाग, वित्त विभागाच्या सहकार्याने, वर उल्लेखकेल्याप्रमाणे तिमाही आकडेवारी प्रसिद्‌ध करेल. याद्वारे निदेशांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल. राष्ट्रपतींचे दिनांक ९ मार्च १९९४ रोजीचे आदेश आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) नुसार योजनेत्तर विकास खर्चाचे प्रदेश निहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेत्तर खर्चाची आकडेवारीसुध्दा प्रसिध्द करण्याविषयी निदेश दिले आहेत.

३७ अविभाज्य योजनांतर्गत खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण ब-याच अंशी नियंत्रित राखल्याबद्‌दल राज्यपाल यांनी नोंद घेतली आहे. नविन आर्थिक वर्षातही हा चांगला बदल सुरु राहणे गरजेचे आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, नियोजन विभागाने अर्थसंकल्प पत्रकांतील अविभाज्य खर्चाची बाबनिहाय पुनर्तपासणी करावी आणि शक्य असेल तिथे त्या त्या प्रदेशांसाठी खर्च दर्शवावा. काही वेळा

आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला असे वर्गीकरण करता येणे शक्य नसेल. मात्र, खर्चाची बाब आर्थिक वर्षाच्या शेवटी विभाज्य म्हणून वर्गीकृत करणे शक्य असल्यास, नियोजन विभागाने मागील आर्थिक वर्षाच्या शेवटच्या खर्चाच्या आकडेवारीवर आधारीत अशा बाबींच्या प्रदेशनिहाय खर्चाची, शक्यतो पुढील आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाही दरम्यान, गणना करावी.

३८ राज्यपाल यांचे असे मत आहे की, अनुशेष निर्मूलनाशी संबंधीत कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी योग्य कार्यप्रणालीची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, या निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विभागीय आयुक्तांनी जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, उच्च व तंत्र शिक्षण आणि कृषी संचाचे विद्युतीकरण या क्षेत्रांच्या अनुशेष निर्मूलनाबाबत त्रैमासिक आढावा घ्यावा. असे करतांना त्यांनी भूसंपादन, प्रकल्पांसाठी शासकीय जमिनीचे हस्तांतरण, वन जमिनीच्या हस्तातरणासंदर्भातील अडचणींचे निरसन, पुरेसे मनुष्यबळाची उपलब्धता,आंतरविभागीय समन्वयन इत्यादी बाबींवर विशेष भर दयावा.

३९ राज्यपाल यांनी मागील काही निदेशांचे कार्यपालन झाले नसल्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. नियोजन विभागाने दि. २७ मे, २००९ च्या निदेशातील परिच्छेद ५४ नुसार योजनांचे परिणाम निर्धारण अभ्यास तसेच परिच्छेद ४१ नुसार प्रकल्पांच्या कालापव्यय आणि दरवाढी संदर्भीचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही. तसेच, दि.१७ मार्च, २०१२ च्या परिच्छेद ४३ नुसार उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ यांच्या आर्थिक वर्ष २००९-१० मधील अखर्चित शिल्लकेमधील विसंगतीची कारणे तपासून या बाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडून अद्याप सादर झालेला नाही. ही अनुपालने तातडीने पूर्ण होतील अशी अपेक्षा राज्यपाल यांनी व्यक्त केली आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनांचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**(विकास चन्द्र रस्तोगी)**
**राज्यपालांचे सचिव**

**राजभवन, मुंबई.**
**दिनांक : १३ मार्च, २०१३.**

**जोडपत्र - १**

निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार (दिनांक १ एप्रिल,१९९४ रोजी असल्याप्रमाणे) प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र. (रुपये कोटीत)

| अनुक्रमांक | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ | ४०८३.०० (५५.०४%) | २५४१.०२ (३८.५७%) | ६६२४.०२ (४७.६०%) |
| २ | मराठवाडा | २४०१.०० (३२.३७%) | १६०३.५५ (२४.३४%) | ४००४.५५ (२८.७७%) |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.०० (१२.५९%) | २४४४.२० (३७.०९%) | ३३७८.२० (२३.६३%) |
| ४ | एकूण | ७४१८.०० (१००%) | ६५८८.७७ (१००%) | १४००६.७७ (१००%) |

आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल.

**जोडपत्र - २**

**अमरावती विभागातील गत ५ वर्षातील दूर झालेला भौतिक अनुशेष**
**जून २००७ चा अनुशेष - ३,३८,०७० हेक्टर**

| | उर्वरित अनुशेष (हेक्टर रसतु मध्ये) | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष ( हेक्टर रसतु मध्ये) |
|---|---|---|
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,९१७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |
| जून २०१२ | २.३४,०१९ | १३,९२९ |

आधार : जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अहवाल

जोडपत्र - ३

**सुधारित भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रम** *

(हेक्टर रसतु)

| अनु क्रमांक | जिल्हा | प्रकल्पांची संख्या | १ जुलै २०१२ रोजीचा शिल्लक सिंचन अनुशेष | २०११-१२ (साध्य) | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | एकूण कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३३ | ७९६८० | ७५६ | २०७२ | १६८५१ | २६४९५ | ३८४६० | ८३८१८ |
| २ | अकोला | १२ | ४९३६७ | ५६७१ | १९२० | ९८८३ | १८३७४ | १७८२७ | ४८००४ |
| ३ | वाशीम | ४८ | ३८३५४ | ३५४२ | १५०३१ | १८१८५ | ६३१२ | ० | ३९५२८ |
| ४ | बुलढाणा | ९ | ६६६१८ | | ६४४१ | ७९८६ | ९१८४ | ४१६५२ | ६५२६३ |
| एकूण (राज्यस्तर) | | १०२ | २३४०१९ | ९९६९ | २५४६४ | ५२९०५ | ६०३६५ | ९७९३९ | २३६६७३ |
| स्थानिकस्तर | | ४ | | १६०५ | २१०० | ५६०० | ५९०० | ६२१८ | १९८१८ |
| एकूण | | १०६ | २३४०१९ | ११५७४# | २७५६४ | ५८५०५ | ६६२६५ | १०४१५७ | २५६४९१ |

* जलसंपदा विभागाचे पत्र दि.८.३.२०१३ नुसार

# २०११-१२ ची प्रत्यक्ष अनुशेष निर्मूलनाची संख्या जून २०११ आणि जून २०१२ च्या शिल्लक अनुशेषाच्या संबधीत संख्येशी जुळत नाही.

**जोडपत्र – ४**

**सुधारित वित्तीय अनुशेष निर्मूलन कार्यक्रम ***

**(रुपये कोटीत)**

| अनुक्रमांक | जिल्हा | प्रकल्पांची संख्या | प्रत्यक्ष २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ | २०१४–१५ | २०१५–१६ | एकूण कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३३ | ३४५.४० | ६१८.११ | ८८०.९७ | ७०६.४९ | ४५७.११ | ३००८.०८ |
| २ | अकोला | १२ | २७०.३३ | २८०.५३ | ५१९.९४ | २८४.२६ | २२४.५६ | १५७९.६१ |
| ३ | वाशीम | ४८ | १६०.०६ | ५२१.०० | २८५.८४ | ६५.५५ | ० | १०३२.४५ |
| ४ | बुलढाणा | ९ | २५९.०१ | ३८४.४३ | ९७२.२२ | ९८४.३५ | ६४३.३६ | ३२४३.३७ |
| | एकूण | १०२ | १०३४.८० | १८०४.०७ | २६५८.९७ | २०४०.६५ | १३२५.०३ | ८८६३.५१ |
| | स्थानिकस्तर | ४ | ८४.३५ | ४०.०० | ५४.०० | ५४.०० | ५७.६७ | २९०.०२ |
| | एकूण प्रदेश | १०६ | १११९.१५ | १८४४.०७ | २७१२.९७ | २०९४.६५ | १३८२.७० | ९१५३.५३ |

* जलसंपदा विभागाचे पत्र दि.८.३.२०१३ नुसार

**जोडपत्र – ५**

**चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत**

| अनुक्रमांक | प्रदेश | दि.१.४.२०११ रोजीची प्रकल्प संख्या | १ एप्रिल २०११ रोजीची शिल्लक किंमत(रु. कोटीत) | दि.१.४.२०१२ रोजीची प्रकल्प संख्या | १ एप्रिल २०१२ रोजीची शिल्लक किंमत(रु. कोटीत)@ |
|---|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ | २७७ | २९४१३ | २६६ | ३०५४४ |
| २ | मराठवाडा | १८३ | १३५८० | १४९ | १२०६५ |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | २८७ | ३२३७३ | २५५ | ३५८४२ |
| | एकूण | ७४७ | ७५३६६ | ६७० | ७८४५१ |

@ तात्पुरती किंमत

आधार : जलसंपदा विभाग

## जोडपत्र - ६ अ

**वार्षिक योजना २०१३-१४ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र**

| प्रदेश | लोकसंख्या * (जनगणना २०११) | लोकसंखेची टक्केवारी | १९९४ मध्ये निव्वळ पेरलेले क्षेत्र (००० हेक्टर)# | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २३००३१७९ | २३.०३% | ५१०६.८ | २८.२७% | २५.६५% |
| मराठवाडा | १८७२७७४८ | १८.७५% | ४७५५.९ | २६.३३% | २२.५४% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५८१६३५९८ | ५८.२३% | ८१९९.३ | ४५.४०% | ५१.८१% |
| एकूण | ९९८९४५२५ | १००.००% | १८०६२ | १००.००% | १००.००% |

* आधार : जनगणना २०११

# आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल भाग एक

## जोडपत्र - ६ ब

**आदिवासी उप योजनेमधील सिंचन क्षेत्रातील नियत व्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र- वार्षिक योजना, २०१३-१४**

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या (जनगणना २००१) | लोकसंख्येची टक्केवारी | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्र ) चौ.कि. मी.) | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २७५६११५ | ३२.४८% | ३११०१ | ५६.०७% | ४४.२७% |
| मराठवाडा | ६०८१०९ | ७.१७% | १९८३ | ३.५८% | ५.३७% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१२१९३२ | ६०.३६% | २२३८२ | ४०.३५% | ५०.३५% |
| एकूण | ८४८६१५६ | १००.००% | ५५४६६ | १००.००% | १००.००% |

आधार : आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**जोडपत्र -७ अ**

**उपलब्ध नियत वाटपातून अनुशेष दूर करणे, तीन प्रदेशांसाठी निधीचे नियत वाटप आणि त्यानंतर उर्वरित निधीचे लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे करावयाचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र** **(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्यय | ६५६३.१७ |
| अनुशेष दूर करण्यासाठी दिलेला नियतव्यय | ७५०.०० |
| नियत वाटप तत्वानुसार नियत वाटपासाठी उपलब्ध नियतव्यय | ५८१३.१७ |

| प्रदेश | अनुशेष जिल्हयांसाठी विशेष नियत वाटप | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण(सम प्रमाणात) | शिल्लक निधींचे संवितरण | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|---|
| विदर्भ | ७५०.०० | २५.६५% | १४९१.०८ | २२४१.०८ |
| मराठवाडा | ० | २२.५४% | १३१०.२९ | १३१०.२९ |
| उर्वरित महाराष्ट्र | ० | ५१.८१% | ३०११.८० | ३०११.८० |
| एकूण | ७५०.०० | १००.००% | ५८१३.१७ | ६५६३.१७ |

**जोडपत्र - ७ ब**

**आदिवासी लोकसंख्या व आदिवासी उपयोजना क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे आदिवासी उप योजना अंतर्गत निधीचे करावयाचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये कोटीत)**

सिंचन क्षेत्रासाठीचा विभाज्य नियतव्यय १०४.६९

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उप योजना क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय भारांक (समान भार) | नियतवाटप |
|---|---|---|
| विदर्भ | ४४.२७% | ४६.३५ |
| मराठवाडा | ५.३७% | ५.६३ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५०.३५% | ५२.७१ |
| एकूण | १००.००% | १०४.६९ |

**जोडपत्र – ८**

**१ फेब्रुवारी २०१३ रोजी असल्याप्रमाणे विकास क्षेत्रातील प्रदेशनिहाय उर्वरित वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये कोटीत)**

| विदर्भ | | मराठवाडा | | उर्वरित महाराष्ट्र | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.२.२०१३ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.२.२०१३ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.२.२०१३ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.२.२०१३ रोजी असलेला उर्वरित अनुशेष |
| १८७.३४ | ३७.६० | ४२२.७४ | २४८.७३ | ७४३.५९ | ३१२.७५ | १३५३.६७ | ५९९.०८ |
| | ६.२७% | | ४१.५२% | | ५२.२१% | | १००% |

**जोडपत्र –९**

**वार्षिक योजना २०१३–१४ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रतील अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र-निहाय नियत वाटप दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये कोटीत)**

| अ. क्र. | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण | ११.६८ | ९.२६ | २१.२० | ४२.१४ |
| अ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ०० | ०० | ९.०० | ९.०० |
| ब | तंत्रनिकेतने | ७.६७ | ४.६४ | ८.०३ | २०.३४ |
| क | तंत्र माध्यमिक शाळा | ४.०१ | ४.६२ | ४.१७ | १२.८० |
| २ | सार्वजनिक आरोग्य | ५०.०६ | ४४.३९ | १५३.२७ | २४७.७२ |
| ३ | पंपसंचाचे विद्युतीकरण | ६०.६४ | ०० | ३१.८४ | ९२.४८ |
| | एकूण ( १ +२ +३) | १२२.३८ | ५३.६५ | २०६.३१ | ३८२.३४ |
| | | ३२.००% | १४.०३% | ५३.९७% | १००% |

**तळटीप :–** परिच्छेद ३३ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रयोजनाकरिता वरील नियतवाटपाखेरीज, **रुपये २ कोटी** इतकी रक्कम राखून ठेवण्यात येईल.